॥ ॐ ॥

डिसेंबर
२०२३

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४     भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org

---

## कै. कृष्णाजी लक्ष्मण तथा किशाभाऊ पटवर्धन
## संस्थापक - ‘स्व’-रूपवर्धिनी

जन्मतिथी : दत्तजयंती, जन्म दिनांक : २५ डिसेंबर, १९२०




*राष्ट्रोन्नति एक मात्र ध्यान हेच चालु दे*
*राष्ट्रजीवनात जीव जीवनान्त पाहु दे ॥ धृ॥*

*सोड भोग मोह स्वार्थ, देह तुझा झिजो परार्थ*
*चंदनी सुगंध मंद, आसमंत भारू दे ॥१॥*

*ध्येयभाव जो मनात येउ दे तुझ्या कृतीत*
*कार्याची कीर्तिध्वजा दूरदेशी फडकू दे ॥२॥*

*कर्मयोग हा ज्वलंत, स्वीकारी तू नितांत*
*दिव्य तुझ्या हवनातूनी, दीपमाळ उजळू दे ॥३॥*

*नकोत अन्य यज्ञ याग, त्याग हाच मान याग*
*बंदिवान आत्मतेज, आज मुक्त होऊ दे ॥४॥*

# शाखा विभाग



◆ **जागर स्त्री शक्तीचा** - प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून स्त्री उभी आहे. आर्थिक स्वातंत्र्य अनुभवायला शिकली आहे. तिच्या गुणांना, मतांना घरात आणि समाजातही किंमत आहे. विविध क्षेत्रे तिने पादाक्रांत केली आहेत. अशा स्त्रीशक्ती विषयी कृतज्ञता शाखांनी विविध कार्यक्रमांतून व्यक्त केली.

स्वामी श्रद्धानंद आणि सावित्री शाखेने मिळून नवरात्रीनिमित्त भाद्रपद शुध्द नवमीच्या दिवशी शाखेत शक्ती पूजनाचा कार्यक्रम घेतला. स्त्रियांप्रती आदर, संवेदनशीलता व समानता यावी या विचाराने चराचराला चैतन्य देणाऱ्या या स्त्री शक्तिचे पूजन मुलांनी केले. उपस्थित महिला पालकांचे पाय धुवून गंध लावून, ओवाळून त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली. 'एक शाखा आपल्या आई-ताईसाठी' असे म्हणत स्वामी अभेदानंद शाखेत महाभोंडल्याचा कार्यक्रम घेण्यात आला. खेळ, गप्पा, गाणी अशा उत्साही वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

दसऱ्यानिमित्त स्वामी सुबोधानंद व स्वामी योगानंद शाखेत शस्त्र व साहित्य पूजन झाले. तसेच स्वामी सुबोधानंद शाखेने राजे शिवराय प्रतिष्ठान यांनी आयोजित केलेल्या शस्त्र पूजनाला भेट देऊन मुलांनी शस्त्राची माहिती घेतली. स्वामी दयानंद सरस्वती शाखेत शस्त्र व मैदान पूजन करून श्री. भरत सूर्यवंशी यांचे 'शिवकालीन शस्त्रे' या विषयावर व्याख्यान झाले तर स्वामी शिवानंद शाखेत राम पूजन व रामायणातील गोष्टी सांगून विजयादशमी साजरी झाली.





◆ **पालकसभा** - दि. ८ ऑक्टोबरला स्वामी योगानंद शाखेची तर १० ऑक्टोबरला स्वामी अखंडानंद शाखेची पालकसभा शुभम जगताप दादाने घेतली. यामध्ये शाखा नियोजन, गणेशोत्सव आढावा, महाशिबिर याविषयी पालकांशी चर्चा केली. श्री. विश्वास कुलकर्णी यांनी स्वामी ब्रम्हानंद शाखेची पालकसभा १३ ऑक्टोबरला घेतली. वर्धक पालकांमधील सकारात्मक संवाद, स्वावलंबन शिकवताना पालकांची भूमिका, वर्धिनीची त्रिसूत्री याबाबत पालकांशी संवाद साधला. याच दिवशी स्वामी सुबोधानंद शाखेतही अभिजित दोडके आणि अक्षय मुळे यांनी ४५ पालकांच्या उपस्थितीत पालकशाखा घेतली. स्वामी दयानंद शाखेत ऑक्टोबर महिन्यात शाखेने पालकसभा घेऊन त्यात सहामाही परीक्षेची पूर्वतयारी म्हणून शाखेत घेण्यात येणाऱ्या परीक्षा पद्धती पालकांना सांगितली.

◆ **राजर्षी शाहू महाराज शाखा** - किल्ले लोहगड सहल - दि. ३ सप्टेंबरला सहल प्रमुख केतन रायरीकर याने भगवा झेंडा फडकवून सहलीची सुरुवात जोरदार घोषणेने केली. पद्य मैफील, गटकार्य, कचरा संकलन स्पर्धा, पोवाडा गायन, शिवचरित्र कथन व शिववंदना अशा भरगच्च कार्यक्रमांनी सहलीचा उत्साह टिपेला पोहोचला.

शाखेत दि. ५ सप्टेंबरला वेगवेगळ्या पानांपासून गणपती तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली. तसेच ९ सप्टेंबर रोजी मुलांना शाखेत 'द लिजेंड ऑफ भगतसिंग' ही फिल्म दाखवण्यात आली. दि. २ ऑक्टोबरला महात्मा गांधी यांच्या १५४ व्या जयंतीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात पोलिस निरीक्षक सचिन पाटील, पोलिस उपनिरीक्षक चंद्रकांत जवळगी, पोलिस उपनिरीक्षक स्नेहल जाधव हे उपस्थित होते.



◆ **स्वामी ब्रह्मानंद शाखेत** ८ ऑक्टोबरला शाखेत शिक्षक सभा घेण्यात आली. यामध्ये मागील तीन महिन्यांचा आढावा, वर्धकांचे परीक्षा संपेपर्यंतचे नियोजन, वर्धकांची अभ्यासातील प्रगती याबाबत शिक्षकांशी संवाद साधला

◆ **धर्मवीर शंभूराजे शाखेत** ५,००० तासांचा विशेष अभ्यासयज्ञ पार पडला. दैनंदिन अभ्यास पूर्ण करून लहान गटासाठी दररोज २ तास तर मोठ्या गटाला ३ तास ज्यादा अभ्यास करण्याचा संकल्प शाखेने केला. अभ्यास यज्ञ सुरू करण्यापूर्वी श्री. चिंचकर सर, अजय रायकर, निलेश धायरकर यांची अभ्यास कौशल्यांबाबत सत्रे आयोजित करण्यात आली. या उपक्रमाचा मुलांना शालेय परीक्षांमध्ये फायदा झाला.

◆ **दिवाळी विशेष - क्रांतिज्योती सावित्री शाखेत** दि. ९ नोव्हेंबर दिवाळीच्या पहिल्या दिवशी वर्धिकांनी स्वतः पणत्या रंगवून शाखा सजवली. याशिवाय या काळात पाककला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, भातुकली, भारुड गायन, एकत्रित फराळ व भाऊबीजेला स्वामी श्रद्धानंद शाखेसोबत भाऊबीज अशा अनेक कार्यक्रमांची रेलचेल शाखेत होती.

◆ **स्वामी शिवानंद शाखेत** धनत्रयोदशीनिमित्त पुस्तकरूपी धनाचे पूजन करण्यात आले. लक्ष्मीपूजनाला पद्मावती मंदिरात उपासना घेण्यात आली.

◆ **स्वामी सुबोधानंद शाखेत** वर्धिनी परिवारातील महत्त्वाचा कार्यक्रम असणाऱ्या आगामी महाशिबिराच्या संकल्पनेवर आधारित दीपोत्सव साजरा झाला. **स्वामी दयानंद शाखेत** दिवाळी आनंद मेळावा व दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले. वर्धक, पालक, परिसरातील परिचित कार्यक्रमाला उपस्थित होते.

◆ **राजर्षी शाहू शाखेने** दिवाळीचे औचित्य साधून वर्धकांमधील विक्री कौशल्य व संवाद कौशल्य विकसित व्हावे यासाठी दि. ७ नोव्हेंबर ते दि. १० नोव्हेंबर या चार दिवसांमध्ये उटणे विक्री उपक्रम घेतला. या चार दिवसांमध्ये मुलांनी उटण्यांच्या १,१०० पाकिटांची विक्री केली. या उपक्रमासाठी आवश्यक भांडवल शाखेतील युवकांनी दिले. शाखेतील इयत्ता नववीतील वर्धक यश जाधव याने सर्वाधिक म्हणजे उटण्यांच्या १०० पाकिटांची विक्री केली.













## उत्थान विभाग

◆ सर्व अभ्यासिका प्रमुखांचे **'मासिक प्रशिक्षण'** दि. ५ नोव्हेंबरला झाले. पद्य व वेगवेगळे खेळ यांचे प्रथम प्रशिक्षण झाले. श्री. निलेश धायरकर सर मार्गदर्शन करताना म्हणाले, 'खेळातून आपले आपण शिकत असतो. या माध्यमातून जीवनात नेतृत्व कधी करायचं, कधी थांबवायचं हे लक्षात येतं. तसेच आपण ठरवलेल्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी प्रयत्नपूर्वक कृती केल्यास ती पूर्णत्वास जाते. आपण मुलांमध्ये बदल घडवण्याचे काम करत आहोत म्हणून स्वतःचा आत्मविश्वास जागा ठेवून काम करत रहायला हवं.'

◆ **आर. एस. बी. फाऊंडेशन सदिच्छा भेट** - फाऊंडेशनचे श्री. राजीव जोशी व श्री. चेतन कुसाळकर हे विभागाच्या मूल्यांकनासाठी व वर्धिनीचे काम बघण्यासाठी आले होते. वर्धिनीच्या कामाच्या माहितीपटातून त्यांना कामाची ओळख झाली. तसेच सर्व कार्यकर्त्यांनी त्यांना कामातील अनुभव सांगितले. त्यानंतर अभ्यासिकेतील विद्यार्थिनी शालिनी गोसावी हिच्या घरी भेट झाली. गृहसंपर्कातून अभ्यासिकेचे काम व कार्यकर्ता निर्माण

यासाठी चाललेली धडपड त्यांच्या लक्षात आली. त्यानंतर त्यांनी ज्ञानज्योती अभ्यासिकेला भेट दिली व तेथील मुलांशी संवाद साधला. वर्धिनीचे काम क्षेत्र पातळीला जाऊन उत्तम रीतीने चालत आहे याचे त्यांनी कौतुक केले.

◆ **दिवाळी उपक्रम** - सर्व अभ्यासिकांमध्ये दिवाळीच्या निमित्ताने पणती रंगवणे, आकाश कंदील तयार करणे, भेटकार्ड बनवणे अशा स्पर्धा झाल्या. तसेच छोट्या प्रमाणात दीपोत्सव आणि दिवाळी साजरी झाली. यात विद्यार्थ्यांचा उत्तम सहभाग होता.

◆ **हसत खेळत शिक्षण** - सर्व अभ्यासिकांमध्ये 'मेधास्वी' या संस्थेने दिलेल्या शिक्षण साहित्याचा उपयोग करून खेळाच्या माध्यमातून मुलांचा अभ्यास चालू आहे. खेळातून शिकवताना विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक मूल्य आणि सहकार्याची भावना रुजवताना कार्यकर्त्यांना वेगळाच अनुभव मिळत आहे.








## पाकोळी बालवाडी

दि. ६ डिसेंबरला सर्व गटांच्या पालकांना मुलांची प्रगती पुस्तक दाखवण्यात आली. सर्व पालक प्रगती पुस्तक वाचण्यात मग्न झाले होते. आपल्या मुलाचे कौतुक वाचताना झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. पालकांनी मुलांच्या घरच्या वर्तणुकीचे लिखाण उत्तम प्रकारे केले आहे.

◆ दिवाळी - दि. ८ तारखेला सर्व गटात दिवाळी उत्साहात साजरी झाली. मुलांनी पालकांच्या मदतीने बनवून आणलेल्या आकाशकंदीलांनी वर्ग व इमारत सजली. व्हरांडा, जिना, फुला-पानांच्या रांगोळ्यांनी सुशोभित झाला तर विविध प्रकारच्या पणत्यांनी झगमगून गेला. मधल्या गटातील मुलांनी मातीचा किल्ला बनवण्याचा आनंद घेतला. मुलांना ताईंनी दिवाळीची माहिती सांगितली. आवाज न होणाऱ्या फटाक्यांच्या रोषणाईचा आनंद घेतला. मुलांनी वर्गात दिवाळीची गाणी म्हणून दाखवली. त्यानंतर जेवणाचा आनंद घेतला. दिवाळीची सुट्टी संपल्यानंतर घरी साजरी केलेल्या दिवाळीचे वर्णन ताईंना व मित्रांना मुले सांगत होती. सध्या नियोजित अभ्यासाचे पाठ व स्नेहसंमेलनाची तयारी वर्गात जोरात चालू आहे.







## स्पर्धा परीक्षा केंद्र

संविधान दिन – केंद्र व अभ्यासिका विभागाच्या वतीने पद्मश्री पोपटराव पवार, आदर्श सरपंच, हिवरे बाजार यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाने संविधान दिन साजरा झाला. 'विकासकामात प्रशासकीय अधिकाऱ्यांची भूमिका' हा विषय त्यांच्या अनुभव कथनातून सर्वांनाच प्रेरणादायी ठरला. ते म्हणाले, 'गावाला सर्वांना सामावून घेणारे चांगले नेतृत्व मिळाले तर गावाचा विकास होण्यात मदत होते. हिवरे बाजारातील तरुणांनी १९८९ साली दिलेल्या हाकेला मी होकार दिला आणि गावाच्या प्रगतीसाठी झोकून दिले. गाव पातळीवर रोजगार निर्मिती आणि जलसंधारण या दोन गोष्टींवर लक्ष केंद्रित करून गावकऱ्यांना याचे महत्त्व पटवून देऊन, कुऱ्हाड बंदी, चराई बंदी, नशा बंदी, श्रमदान आणि वृक्षारोपण या पंचसूत्रीवर आदर्श गावाची संकल्पना मांडून आज हिवरे बाजारला 'आदर्श गाव' ही ओळख मिळाली आहे. अधिकारी म्हणून काम करताना श्री. तुकाराम मुंडे, श्री. अजित रानडे, श्री. महेश भागवत यांच्या प्रशासनामधील उल्लेखनीय कामातून प्रेरणा घेतली पाहिजे. आजची तरुणाई देश बदलू शकते. प्रशासन हेच समाजातील आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील दरी कमी करू शकते. या विचाराने तुम्हीही कार्यरत व्हा.'








## श्रद्धांजली

- वर्धिनीत अनेक वर्षे चालक म्हणून सेवा देणारे **श्री. अशोक मुटकुळे** यांचे निधन झाले.
- वर्धिनीच्या ग्रंथपाल श्रीमती नीला कुडलिंगार (अव्वा) यांच्या सासूबाई **श्रीमती नागव्वा तथा अम्मा कुडलिंगार** यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. रामकृष्ण शाखेचे युवक किरण कुडलिंगार आणि भगिनी निवेदिता शाखेच्या युवती मंगलताई, सुरेखाताई, विद्याताई, कल्पनाताई यांच्या त्या आजी होत.
- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते श्री. राहुल पुंडे यांच्या आई **सौ. रंजना रत्नाकर पुंडे** यांचे निधन झाले.
- वर्धिनीचे देणगीदार जयवंत फडके यांच्या पत्नी **सौ. अमिता फडके** यांचे अल्पशः आजाराने निधन झाले.
- गरवारे बालभवनच्या संचालिका, सामाजिक कार्यकर्त्या **श्रीमती शोभाताई भागवत** यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले.



**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**

